महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
संचालनालय, लेखा व कोषागारे
कस्तुरी बिल्डींग,तळ मजला, ज.टाटा मार्ग
पेट्रोलियम हाऊसच्या समोर, चर्चगेट, मुंबई ४०० ०२०

दूरध्वनी क्र:-०२२- २२८८०१०६/१०७/१०८ email id: aao.prashakosha-mh@gov.in

संदर्भ-
१. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-१०९५/प्र.क्र.१/९५/बारा, दि.०८.०६.१९९५.
२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-१०९५/प्र.क्र.३३/९५/बारा, दि.०१.११.१९९५.
३. शासन निर्णय, वित्त विभाग क्र.११९९/प्र.क्र.२/९९/सेवा-३, दि.२०.०७.२००१.
४. शासन निर्णय, वित्त विभाग क्र.वेतन-२०००/प्र.क्र.१०/सेवा-३,दि.०३.०८.२००१.
५. शासन निर्णय, वित्त विभाग क्र. असंक-१००१/प्र.क्र.२९ (भाग-४)/२००४/वित्तीय सुधारणा-१, दि.२६.०३.२००४.
६. शासन निर्णय वित्त विभाग क्र.वेतन-११०९/प्र.क्र.१/०९/सेवा-३, दि.१५.१०.२००९ व शुध्दीपत्रक दि.२१.०५.२०१०
७. शासन निर्णय, वित्त विभाग क्र.११०९/प्र.क्र.४४/सेवा-३, दि.०१.०४.२०१०
८. शासन निर्णय, वित्त विभाग क्र.११०९/प्र.क्र.४१/सेवा-३, दि.०५.०७.२०१०
९. शासन शुध्दीपत्रक क्र.आप्रयो-१०१५/प्र.क्र.१११/२०१५/सेवा-३, दि.२३.१२.२०१५
१०. वित्त विभाग शा.नि.क्र.वेतन-१०१४/प्र.क्र.१६/सेवा-३, दि.१६.०७.२०१६

क्र.संलेको/प्रशा कोषा/कार्या-३/आ.प्र.यो.दुसरा लाभ/789 दि. 10 JUL 2024

**विषय : शिक्षण विभागामध्ये अतिरिक्त ठरलेल्या व त्याच विभागातून कालबध्द पदोन्नती अंतर्गत पहिला लाभ घेऊन समावेशनाने लेखा व कोषागारे विभागात टिप्पणी सहायक पदावर नियुक्ती दिलेल्या कर्मचाऱ्यांना सेवांतर्गत सुधारित आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत दुसरा लाभ लागू करणेबाबत. श्री.गणेश रुपचंद वारदेव, सेवानिवृत्त सहायक अधीक्षक**

**प्रस्तावना :-**

श्री. ग.रु. वारदेव यांची शासन सेवेतील प्रथम नियुक्ती जिल्हा प्रौढ शिक्षण अधिकारी, नागपूर यांचे कार्यालयात पर्यवेक्षक या पदावर झालेली असून त्यांचा नियुक्तीचा दिनांक १०.०४.१९८५ असा आहे.

श्री. ग.रु. वारदेव यांनी त्यांच्या सेवेची १२ वर्षे दि. १०.०४.१९९७ रोजी पूर्ण केलेली आहे. तथापि पदोन्नतीच्या पदासाठी आवश्यक असलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण नसल्याने त्यांना त्यांच्या मूळ विभागाने (शिक्षण विभागाने) कालबध्द पदोन्नती अंतर्गत पहिला लाभ त्यांनी सदर अर्हता धारण केल्यानंतर दि.१९.१२.२००१ पासून अनुज्ञेय केला. त्यानुसार श्री. वारदेव यांना कालबध्द पदोन्नतीच्या पहिल्या लाभांतर्गत सहायक प्रकल्प अधिकारी या पदाची पाचव्या आयोगानुसार रु. ६०००-१७५-१०,०००/- (६व्या आयोगानुसार रु.९३००-३४८००+ ग्रेड वेतन रु.४४००/-) ही वेतन श्रेणी लागू करण्यात आली. तदनंतर त्यांना दि. १५.०७.२००३ पासून समायोजनाने सहसंचालक, लेखा व कोषागारे, अमरावती येथे टिपणी सहायक वेतनश्रेणी रु.४०००-१००-६०००/- (६व्या

आयोगानुसार रु. ५२००-२०२००/- + ग्रेड वेतन रु.२८००/-) या पदावर समावून घेण्यात आले व त्यांचे वेतन रु.९३००-३४८००+ ग्रेड वेतन रु.४४००/- या वेतन श्रेणीत संरक्षित करण्यात आले.

श्री.वारदेव यांना कालबध्द पदोन्नती योजनेअंतर्गत पहिला लाभ दि. १९.१२.२००१ रोजी अनुज्ञेय केला असल्याने त्यांना दुसरा लाभ दि. १९.१२.२०१३ रोजी देय आहे. वित्त विभाग शा.नि.क्र.वेतन-१०१४/प्र.क्र.१६/सेवा-३, दि.१६.०७.२०१६ नुसार, मूळ विभागात सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचे लाभ घेऊन अतिरिक्त ठरलेल्या व नवीन विभागात समावेशनाने नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांना देखील नवीन विभागातील पदोन्नतीच्या साखळीतील पदासाठी विहित केलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण केल्याच्या तारखेपासून नवीन विभागात त्यांनी धारण केलेल्या पदास, पदोन्नतीच्या साखळीतील पदाच्या वेतनश्रेणीत वेतन निश्चितीचा लाभ अनुज्ञेय राहिल, असे आदेशित केले आहे. त्यानुसार लेखा व कोषागारे या विभागात टिप्पणी सहायक संवर्गाच्या पदोन्नती साखळीनुसार कालबध्द पदोन्नती योजनेअंतर्गत पहिला लाभ हा सहायक अधीक्षक पदाचा (रु.९३००-३४८००+ ग्रेड वेतन रु.४२००/-) व दुसरा लाभ सहायक लेखा अधिकारी (रु.९३००-३४८००+ ग्रेड वेतन रु.४४००/-) या पदाचा अनुज्ञेय ठरतो.

**//आदेश//**

शासन वित्त विभागाच्या उपरोक्त संदर्भ क्र.७ वरील निर्णयान्वये सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना दि.०१.१०.२००६ पासून अंमलात आली आहे. सदर शासन निर्णयान्वये आश्वासित प्रगती योजनेच्या पहिल्या लाभानंतर १२ वर्षाची नियमित सेवा पूर्ण केलेल्या राज्य शासकीय कर्मचा-यांना सुधारित आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत दुसरा लाभ अनुज्ञेय आहे.

श्री. ग. रु. वारदेव, सहायक अधिक्षक यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत दुसरा लाभ हा सहायक लेखा अधिकारी या पदाचा अनुज्ञेय ठरतो. त्यानुसार श्री. वारदेव यांना दि.१९.१२.२०१३ पासून आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत सहायक लेखा अधिकारी (रु.९३००-३४८००+ ग्रेड वेतन रु.४४००/-) या पदाचा दुसरा लाभ मंजुर करण्यात येत आहे.

तथापि श्री.वारदेव हे रु.९३००-३४८००+ ग्रेड वेतन रु.४४००/- या वेतनश्रेणीतच वेतन घेत असल्याने त्यांना दि. १९.१२.२०१३ पासून आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत दुसरा लाभ अनुज्ञेय केल्याने त्यांच्या वेतनबँड व ग्रेड पे मध्ये बदल होणार नसला तरीही त्यांना पदोन्नतीच्या अनुषंगाने एक वेतन वाढ अनुज्ञेय होईल.

**(दीपा देशपांडे)**
**संचालक, लेखा व कोषागारे,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

**प्रत -**

- सहसंचालक, लेखा व कोषागारे, नागपूर विभाग, नागपूर.
- श्री. ग.रु. वारदेव, सेवानिवृत्त सहायक अधिक्षक यांना सहसंचालक लेखा व कोषागारे, नागपूर यांचेमार्फत.
- निवड नस्ती (प्रशासन क व ड शाखा)